ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# जागतिकीकरणात महाविद्यालयीन शिक्षकापुढील आव्हाने

**प्रा.डॉ.बाळासाहेब दिघे**
सहाय्यक प्राध्यापक,
म.ए.सो.चे, नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, कर्वे रोड, पुणे –२७

सारांश –

सध्याचे शतक जागतिकीकरणाचे युग म्हणून ओळखले जाते. बदलत्या काळामध्ये प्राचीन संकल्पनांना नवनवीन संदर्भ देऊन सद्यस्थितीतील उपयुक्तता पटवून देण्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. भारतीय संस्कृतीचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देऊन मूल्यसंस्काराचे महत्त्व नकळत त्यांच्या मनावर बिंबवावे लागणार आहे. 'जुने ते सोने' या तत्वानुसार पारंपारिक शिक्षणाचे महत्त्व व बदलत्या काळातील शिक्षणपध्दती यांची सांगड घालून नवनवीन तंत्रज्ञानासाठी तत्पर रहावे लागणार आहे. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान यांच्याव्दारे प्रथम स्वत:मध्ये बदल करून नंतर विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यासाठी सक्षम व्हावे लागणार आहे. विद्यार्थी–शिक्षक–पालक यांच्यामध्ये सुसंवाद घडवून आणून नकळत विद्यार्थ्यांमध्ये नकळत शिस्त आणण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.

सद्याच्या काळात विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची भूक वाढत चालल्याने शिक्षकांपुढे आव्हान निर्माण झाले आहे. शिक्षणातील विद्यार्थी गळती थांबवून महाविद्यालयामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने शिक्षकाने निरनिराळे प्रशिक्षण घेतले पाहिजे.

## १.१ प्रस्तावना –

जागतिकीकरणाचे परिणाम आता देशातील सर्वच क्षेत्रांमध्ये दिसू लागले आहे. समाजरचनेच्या व्यवस्थेत शिक्षणक्षेत्राचे स्थान हे महत्त्वाचे असते. आपल्या राज्यघटनेने देशातील सामजिक व आर्थिक विषमता नष्ट करण्याचे साधन म्हणून शिक्षणक्षेत्राला महत्त्व दिले आहे. देशाने १९८६ साली राष्ट्रीय शिक्षणाचे धोरण निश्चित केले, परंतु अलीकडे साम्राज्यवादी शक्तीच्या प्रभावामुळे शिक्षणक्षेत्राचे बाजारीकरण झालेले दिसून येते. शिक्षणक्षेत्रातही जागतिकीकरणाचे परिणाम दिसू लागले आहे.

भारत सरकारने शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% रक्कम शिक्षणावर खर्च करण्याचे जाहीर केले आहे, परंतु स्वातंत्र्याला ६० पेक्षा अधिक वर्षे पूर्ण झाले तरीही अजूनही त्या आश्वासनांची ठोस पूर्ती केली गेली नाही. स्वातंत्र्यानंतर तर या क्षेत्राकडे एका वेगळया दृष्टीने पाहण्यात येत आहे.

**१.२ जागतिकीकरणामध्ये शिक्षकापुढील आव्हाने –**

१. शिक्षकाने विद्यार्थ्यांना निश्चित स्वरूपाचे ध्येय देऊन आपण शिक्षण कशासाठी घ्यायचे? हे पटवून द्यावे. समाजासाठी आपण काय करू शकतो? याचे शिक्षण द्यावे.

२. बदलत्या काळात शिक्षकाने बदलले पाहिजे. शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन नवनवीन तंत्रज्ञानाचा व नवनवीन अध्यापनपध्दतींचा उपयोग करून विद्यार्थ्यांना शिकविले पाहिजे.

३. दररोज जगात घडामोडी होत असतात. काल जगात काय झाले?, आज काय चालले आहे? व उद्या काय होणार आहे? यासाठी भरपूर वाचन करून माहिती गोळा करावी लागणार आहे. विपुल वाचन करून मनन, चिंतन स्मरण करावे लागेल.

४. स्पर्धचे युग निर्माण झाल्यामुळे परदेशी विद्यापीठांतील शिक्षकांबरोबर स्पर्धा करावी लागणार आहे. केवळ पुस्तकांवर अवलंबून न राहता व्हिडीओकॉन्फरन्स, कॉम्प्युटर ॲसेस्टेड लर्निंग यासारख्या नवनवीन तंत्रज्ञान व साधनांव्दारे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावे लागेल.

५. आपल्यापुढे नवीन आव्हाने काय आहे? याची आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली पाहिजे. त्या नवीन आव्हानांना सामोरे जाण्यास शिकविले पाहिजे.

६. पुस्तकांच्या ओझ्याखाली दबलेल्या विद्यार्थ्यांना मुक्त करून अभ्यास व अनुभवाच्या आधारे शिक्षण देण्यावर भर द्यावा.

७. आज सार्वजनिक जीवनात आदर्श दिसत नाही. सर्वत्र अंदाधुंदी, स्वैराचार बोकाळलेला आहे. या परिस्थितीमध्ये निर्मळ चारित्र्य व आदर्श नागरिक घडविण्यासाठी शिक्षकाला मूल्य शिक्षण स्वत:च्या आचरणातून द्यावे लागणार आहे.

८. नवनवीन शैक्षणिक श्राव्य, दृक, दृक–श्राव्य साधनांव्दारे विद्यार्थ्यांना शिकविणे व त्या साधनांव्दारे प्रत्यक्ष कृती करून घेणे.

९. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमूख शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करणे.

१०. समाजाला गरीबी व विषमता यातून बाहेर काढण्यासाठी ज्ञान व कौशल्याची नितांत गरज आहे यासाठी या गोष्टी विद्यार्थ्यांना शिकविल्या पाहिजे.

११. ज्ञानाला मेहनतीशिवाय पर्याय नाही, म्हणून प्रचंड मेहनत घेण्याची तयारी ठेवून जागतिकीकरणाच्या स्पर्धेत गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्त्न करून टिकावे लागणार आहे.

१२. इंग्रजी भाषेचा वापर अनिवार्य आहे परंतु बदलत्या परिस्थितीत उपयोगी पडू शकेल अशा वेगवेगळया भाषा आत्मसात कराव्या लागणार आहे. विद्यार्थ्यांची गरज ओळखून त्याच्याशी संवाद साधण्यासाठी निरनिराळया भाषा आत्मसात करावी लागणार आहे.

१३.इंग्रजी भाषेबरोबर आपली भाषा ज्ञानभाषा कशी होऊ शकेल? याबाबत प्रयत्न केला पाहिजे.

१४.विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती शोधण्यासाठी चिंतन, मनन व शोध याव्दारे विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे लागेल.

१५.वर्गातील विद्यार्थी माझे आहे. समुद्रात ज्याप्रमाणे लाट येते व जाते, पाणी तसेच राहते या नियमाप्रमाणे दरवर्षी विद्यार्थी येतात व जातात परंतु हि मुले उद्या उज्ज्वल भारताचे भविष्य घडविणार आहे. त्यासाठी अचल राहून नित्यनियमितपणे अखंड ज्ञानदानाचे कार्य करायचे आहे असे शिक्षकाला वाटले पाहिजे.

१६.शिक्षकाने नियमितपणे शाळेत येऊन विद्यार्थ्यांना शिकविले पाहिजे. ठरवून दिलेल्या वेळे अगोदर किमान १० ते १५ मिनिटे पूर्वी शाळेत हजर राहिले पाहिजे. कित्येक ठिकाणी शिक्षक वेळेविषयी बेफिकीर असलेले आढळून येतात. वेळेवर तासाला न जाणे, संस्थेने दिलेला वेळ न पाळणे, शाळा सोडून आपली खाजगी कामे करणे, विनाकारण कोठेही भटकणे यासारखी अनेक खाजगी कामे काही शिक्षक करत असतात. शाळेच्या वेळेत कामे बाजूला ठेऊन संस्थेने ठरवून दिलेला वेळ विद्यार्थ्यांसाठी देणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे.

१७.शिक्षकाच्या प्रती समाजामध्ये आदर भरलेला असल्याने शिक्षकाने संस्थेमध्ये किंवा समाजामध्ये नि:स्वार्थीपणे कर्तव्य करावे. विद्यार्थी हे शिक्षकाला आपले दैवत समजत असल्याने ते शिक्षकाचे अनुकरण करत असतात. आपण समाजाला मार्गदर्शन करत आहोत याचा कदापीही विसर पडू देऊ नये. आपण समाजामध्ये देशासाठी भावी नागरिक तयार करत आहे हे ओळखून शिक्षकाने सतत स्वार्थापासून दूर

जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण या परिस्थितीत शिक्षकाला नवसमाज निर्माण करायचा आहे हे विसरून चालणार नाही. युवकांना नवीन ध्येयांची ओळख करून द्यावी लागणार आहे. त्यांच्या समोर असर्णाया आव्हानांची विद्यार्थ्यांना कल्पना द्यावी लागणार आहे. कोणती आव्हाने आहे, त्यासाठी काय करावे लागणार आहे याची जाणीव करून देऊन त्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती करून द्यावी लागणार आहे.

सतत नवीन ज्ञानाच्या शोधात रहावे लागेल. बदलत्या काळात उच्चतम ज्ञान व कौशल्ये संपादन केल्याखेरीज स्पर्धेत टिकता येणार नाही हे ओळखले पाहिजे. नवनवीन संशोधन प्रकल्प हाती घेऊन प्रगतीची वाटचाल केली पाहिजे. ज्ञानाची कक्षा वाढविली तर विद्यार्थ्यांना नवीन दृष्टी मिळू शकेल. त्यासाठी बदलत्या घटनांचा वेध घेतला पाहिजे. कारण जागतिकीकरणाच्या काळात शिक्षकाची भूमिका बदलत जात आहे. शिक्षकाने सतत ज्ञान अद्ययावत केल्यास विद्यार्थ्यांना नवीन दृष्टी देऊ शकेल.

**१.३ निवडक संदर्भ** :


१. त्रैमासिक 'शिक्षणातील मर्मदृष्टी', संपा. चव्हाण किशोर, इनसाईट पब्लिकेशन, नाशिक, एप्रिल ते जून २००९

२. जोशी बी.आर., डायमंड सामाजिक ज्ञानकोश', डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती,२००७

३. जोशी बी.आर., शिक्षणशास्त्र कोश', डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती,२००७